# डॉ. के. एम. गरडकर यांची फेलोपदी निवड

**पाचगाव :** शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातील प्रा. के. एम. गरडकर यांची महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस फेलोपदी निवड करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेस ही राज्यातील नामांकित संस्था असून फेलोच्या यादीमध्ये महाराष्ट्र राज्यातील तसेच राज्याबाहेरील शास्त्रज्ञांचा त्यांच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधनाच्या कामगिरीच्या आधारे निवड केली जाते. या यादीमध्ये सन २०२० यावर्षासाठी शिवाजी विद्यापीठातून प्रा. गरडकर यांची एकमेव निवड झाली आहे.

प्रा. गरडकर हे नॅनोमटेरिअल्स या क्षेत्रात काम करीत असून त्यांनी पाण्यातील रंगद्रव्यांचे विघटन सूर्यप्रकाशाच्या मदतीने करण्याची उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही रंगद्रव्य फक्त अर्ध्यातासामध्ये जवळपास ९५ टक्के नष्ट केली आहेत. तसेच त्यांची राष्ट्रीय आणि आतंरराष्ट्रीय स्तरावर एकूण १५० शोधपत्रिका प्रकशित झाल्या आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १० विद्यार्थ्यांना पीएच. डी पदवी मिळाली असून सध्या ८ विद्यार्थी नॅनोमटेरिअल्स या विषयावर कार्य करीत आहेत. सध्या ते डिपार्टमेंट ऑफ इंडस्ट्रियल केमिस्ट्रीचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

# विद्यापीठ पात्रतेसाठी संपर्क साधण्याचे आवाहन

गडहिंग्लज : प्रतिनिधी

शिवराज महाविद्यालयात यावर्षी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ पात्रतेसाठी शिवराज महाविद्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बीए, बीकॉम, बीएस्सी, बीबीए, बीसीए, बीसीएस या अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठाच्या पात्रतेसाठी मुदतवाढ दिली आहे. महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या ऑनलाइन पात्रतेसाठी २२ डिसेंबर रोजी प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेचे सचिव अनिल कुऱ्हाडे, प्राचार्य डॉ. एस. एम. कदम, रजिस्टार संतोष शहापूरकर यांनी केले आहे.

# बॅकलॉगच्या परीक्षा आजपासून

प्रतिनिधी
कोल्हापूर

- महाविद्यालय व अधिविभाग स्तरावर १५ ते ३१ डिसेंबर कालावधीत परीक्षा
- परीक्षा विभागाकडून महाविद्यालयांना पत्र

शिवाजी विद्यापीठातील पदवी अंतिम वर्षासाठी प्रवेशित असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्यात आल्या. परंतु राज्य सामाईक प्रवेश परीक्षा, कोविड संसर्ग आदी कारणाने परीक्षा देवू न शकलेल्या विद्यार्थ्यांच्या पुनर्परीक्षा . आयोजित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पदवी अंतिम वर्षासाठी प्रवेशित व बॅकलॉग विद्यार्थ्यांची परीक्षा आजपासून सुरू होणार आहेत. या परीक्षा १५ ते ३१ डिसेंबर या कालावधीत घेण्यात याव्यात, असे परिपत्रक महाविद्यालय आणि अधिविभागांना परीक्षा विभागाकडून पाठण्यात आले आहे.

पदवी अंतिम वर्षासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पुनर्परीक्षा व बॅकलॉग परीक्षांचे महाविद्यालय स्तरावर परीक्षांचे नियोजन करावे. विद्यापीठाने निश्चित केलेल्या धोरणानुसार या परीक्षा घेण्यात येणार आहेत. कोरोनाच्या नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. ऑनलाईन आणि ऑफलाईन, मार्चमध्ये अर्ज भरला परंतु परीक्षा झालेल्या नाहीत. त्यांच्या परीक्षा अग्रणी महाविद्यालयामार्फत घेतल्या जाणार आहेत. परंतु उत्तरपत्रिका तपासणी महाविद्यालय स्तरावर होणार.

**पदवी व पदव्युत्तर परीक्षा १७ पासून**

परीक्षेला काही कारणास्तव उपस्थित राहू न शकलेल्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने १७ ते ३१ डिसेंबर कालावधीत होणार आहे. परीक्षेला २७५ विषयांसाठी ११०० विद्यार्थी बसणार आहेत. परीक्षा ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या सूचना विद्यार्थ्यांनी पाहाव्यात, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे पळसे यांनी केले आहे.

# कायद्यासंदर्भातील सूचनांचे स्वागत

## डॉ. सुखदेव थोरात यांची ग्वाही : कायदा मूल्यमापन समितीच्या बैठकीस प्रारंभ

प्रतिनिधी
कोल्हापूर

केंद्राच्या नूतन शैक्षणिक धोरणानुसार राज्य शासनाच्या सार्वजनिक विद्यापीठ कायद्यामध्ये योग्य सुधारणा करण्यासाठी सर्व चांगल्या सूचनांचे स्वागत असून त्यातील अधिकाधिक सूचनांचे पालन करण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी ऑनलाईन संवाद साधताना दिली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम-२०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी डॉ. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती' ही उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीच्या दोनदिवसीय बैठकांना सोमवारी शिवाजी विद्यापीठ अधिकाऱ्यांबरोबर प्रारंभ करण्यात आला. या बैठकीचे औपचारिक उद्घाटन करताना डॉ. थोरात बोलत होते.



या समितीकडे शासनाने जबाबदारीचे काम सोपविलेले आहे. आतापर्यंत समितीला सुमारे २५० विविध सूचना प्राप्त झाल्या आहेत. आलेल्या सूचनांचा अभ्यास करून ही समिती निर्णय घेईल असे डॉ. थोरात यांनी सांगितले.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षण पुणे विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी संयोजन केले. बैठकीस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह समितीचे सदस्य मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, डॉ. राजन वेळूकर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. नरेश चंद्रा, मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या शीतल देवरुखकर-शेठ, विल्सन महाविद्यालयाचे शिक्षण संचालक डॉ. टी. ए. शिवारे, आदी सदस्य उपस्थित होते.

अधिकार मंडळावर प्राचार्यांची नियुक्ती करताना ती निवडणूकीतून केली पाहिजे. एखाद्या महाविद्यालयाला नॅक मानांकन नसले तरीही त्या प्राचार्यांना मतदानाचा अधिकार द्यावा. विविध शाखांमध्ये डीनची नियुक्ती पुर्वीच्या कायद्याप्रमाणे करावी. अशा सूचना प्राचार्य संघटनेच्या वतीने प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केल्या. यावेळी डॉ. जे. एफ. पाटील, डी. यु. पवार, डॉ. सार्जेराव पाटील उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांना निरोपच नाही...

विद्यापीठ कायद्यासंदर्भात विद्यार्थ्यांची मते जाणून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठाने निरोपच दिला नाही. त्यामुळे उपसमितीने विद्यार्थ्यांना आज मंगळवार (दि १५) सकाळी विद्यापीठ व शैक्षणिक कायद्यासंदर्भात सूचना मांडण्यासाठी बोलवण्यात आले आहे. मंदार पाटील यांनी खंत व्यक्त केली.

### अधिविभागप्रमुख गैरहजर....

विद्यापीठ कायद्यासंदर्भात सूचना करण्यासाठी विद्यापीठातील अधिविभागप्रमुखांना बोलावण्यात आले होते. ३८ अधिविभागप्रमुखांपैकी तीनच अधिविभागप्रमुख उपस्थित होते. त्यामुळे उपसमितीने त्यांच्या सूचना ऐकूनच घेतल्या नाहीत. विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवणाऱ्या कायद्यासंदर्भात सूचना करण्यासाठी अधिविभागप्रमुखच गैरहजर असल्याची चर्चा विद्यापीठ वर्तुळात होती.

# विद्यापीठे कायद्यात सुधारणांसाठी सूचनांचे स्वागत

## डॉ. सुखदेव थोरात; शिवाजी विद्यापीठात दोन दिवसीय बैठकीस प्रारंभ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्राच्या नवीन शैक्षणिक धोरणानुसार राज्य शासनाच्या सार्वजनिक विद्यापीठे कायद्यात योग्य सुधारणासाठी चांगल्या सूचनांचे स्वागत आहे. त्यातील अधिकाधिक सूचनांचा अंगीकार करण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ, 'यूजीसी'चे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी दिली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम-२०१६ मध्ये सुधारणासाठी डॉ. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती' उपसमितीच्या दोन दिवसीय बैठकांना सोमवारी सुरुवात झाली. औपचारिक उद्घाटनप्रसंगी डॉ. थोरात बोलत होते. डॉ. थोरात म्हणाले, समितीकडे २५० सूचना प्राप्त झाल्या आहेत. कुलगुरू, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आदी घटकांचे कायद्याच्या अनुषंगाने वर्षभरातील अनुभव, अडचणी विचारात घेऊन त्यांनी केलेल्या सूचनांवर विचारविनिमय करण्यात येईल.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी संयोजन केले. यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, समिती सदस्य माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, डॉ. राजन वेळूकर, माजी कुलगुरू डॉ. बी.पी. साबळे, माजी प्र-कुलगुरू डॉ. नरेश चंद्रा, शीतल देवरुखकर-शेठ, डॉ. टी.ए. शिवारे उपस्थित होते.

उपसमितीने दिवसभरात विविध संघटना प्रतिनिधींसमवेत संवाद साधला. विद्या परिषदेवर निवडणुकीद्वारे प्राचार्यांची निवड केली जावी, महाविद्यालयाचे नॅक पूर्ण झाले नाही म्हणून अधिकार मंडळाच्या विविध पदांसाठी उभे राहण्यापासून प्राचार्यांना वंचित ठेवू नये. अधिष्ठातांची नियुक्ती पूर्वीच्या कायद्याप्रमाणे व्हावी. बीसीयूडी संचालकपद पूर्वीप्रमाणे ठेवावे, अशा सूचना डॉ.जे. एफ. पाटील, डॉ. डी. यू. पवार, डॉ.व्ही. एम. पाटील, डॉ. सर्जेराव पाटील यांनी प्राचार्य संघटनेच्या प्रतिनिधींनी केली. एनएसएससारखे विद्यापीठात संचालकपद असावे, अशी सूचना डॉ. रूपा शहा यांनी केली. याप्रसंगी 'सुटा'चे डॉ. आर.जी.कोरबू, डॉ. डी. एन. पाटील यांनीही सूचना मांडल्या.

### विद्यार्थी संघटनांसमवेत आज चर्चा

उपसमिती मंगळवारी सकाळी ११ ते ११.३० या कालावधीत विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधणार आहे. ज्या विद्यार्थी संघटनेच्या प्रतिनिधींना उपस्थित राहावयाचे आहे, त्यांनी संघटनेच्या प्रत्येकी दोन प्रतिनिधींना उपस्थित राहता येईल. सूचना लेखी स्वरूपात बैठकीवेळी सभागृहात समितीकडे सादर कराव्यात, असे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

# योग्य सूचना विचारात घेऊनच विद्यापीठ कायद्यात सुधारणा

## सुखदेव थोरात : 'विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती'च्या बैठकीस प्रारंभ

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सार्वजनिक विद्यापीठे कायद्याच्या सर्वच घटकांचे पुनरावलोकन करावे लागणार आहे. त्यादृष्टीने या घटकांच्या लेखी सूचनांचा विचार करून त्यातील योग्य व चांगल्या सूचना विचारात घेऊन कायद्यात सुधारणा सुचविण्यात येतील, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी सोमवारी येथे सांगितले.

### विद्यार्थी निवडणुका सुरु करा

■ विद्यार्थी निवडणुका सुरु करा, अधिकार मंडळांमध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी वाढवा, यासह बृहत आराखडा, परीक्षा प्रमाद समितीशी संबंधित विविध सूचना या समितीकडे करण्यात आल्या.

■ समिती आज, मंगळवारी सकाळी अकरा ते साडेअकरा दरम्यान विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधणार आहे.



### उपसमितीतील सदस्य

या उपसमितीच्या सदस्यांमध्ये मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. विजय खोले, डॉ. राजन वेळूकर, माजी प्र-कुलगुरु डॉ. नरेश चंद्रा, अधिसभा सदस्य शीतल देवरुखकर-शेठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. बी.पी. साबळे, विल्सन महाविद्यालयाचे शिक्षण संचालक डॉ. टी. ए. शिवारे यांचा समावेश आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम-२०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी डॉ. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती' ही उपसमिती स्थापन केली आहे. या समितीच्या दोनदिवसीय बैठकांना सोमवारी सकाळी विद्यापीठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकीने प्रारंभ झाला. त्यावेळी डॉ. थोरात यांनी ऑनलाईन मार्गदर्शन केले.

आतापर्यंत समितीला विविध सुमारे २५० सूचना प्राप्त झाल्या आहेत. आणखी सूचना अपेक्षित आहेत. कुलगुरू, कुलसचिव, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, आदी सर्व संबंधित घटकांचे या कायद्याच्या अनुषंगाने गेल्या वर्षभरातील अनुभव, अडचणी विचारात घेऊन त्यांनी केलेल्या सूचनांवर विचारविनिमय करण्यात येईल, असे डॉ थोरात यांनी सांगितले.

यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, आदींसह समिती सदस्य उपस्थित होते. उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पुणे विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांनी प्रास्ताविक केले.

# पदवी, पदव्युत्तर पुनर्परीक्षार्थी, बॅकलॉग परीक्षांना आजपासून सुरुवात

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवार (दि.१५) पासून पदवी, पदव्युत्तर पुर्नपरीक्षार्थी, बॅकलॉग परीक्षांना आजपासून महाविद्यालय स्तरावर सुरुवात होणार आहे. विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने परीक्षांचे नियोंजन करण्यात आले आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासकीय नियमांचे पालन करण्याच्या सूचना महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. १५ ते ३१ डिसेंबर या कालावधीत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. तसेच परीक्षेला काही तांत्रिक कारणास्तव न बसता आलेल्या अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षा १७ डिसेंबरपासून सुरू होणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी सांगितले.

# विद्यापीठ अधिनियम सुधारणेसाठी संवाद आवश्यक : डॉ. थोरात



कोल्हापूर, ता. १४ : केंद्राच्या नूतन शैक्षणिक धोरणानुसार राज्य शासनाच्या सार्वजनिक विद्यापीठे कायद्यामध्ये योग्य सुधारणा करण्यासाठी विद्यापीठातील सर्व घटकांशी संवाद आवश्यक आहे. चांगल्या सूचनांचे स्वागत असून त्यातील अधिकाधिक सूचनांचा अंगिकार करण्याचा प्रयत्न राहील, अशी ग्वाही ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी आज येथे ऑनलाईन संवाद साधताना दिली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम- मध्ये सुधारणा करण्यासाठी डॉ. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती ही उपसमिती स्थापन करण्यात आली आहे. या उपसमितीच्या दोनदिवसीय बैठकांना आज सकाळी विद्यापीठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकीने प्रारंभ झाला.

डॉ. थोरात म्हणाले, 'समितीला सुमारे विविध सूचना प्राप्त झाल्या आहेत. आणखीही सूचना विविध घटकांकडून येत्या दोन दिवसांत अपेक्षित आहेत. त्या लक्षात घेऊन त्यांचा सांगोपांग अभ्यास करण्याचे काम समितीला करावयाचे आहे. विद्यापीठांचे कुलगुरू, कुलसचिव, वित्त व लेखाधिकारी, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आदी सर्व संबंधित घटकांचे सदर कायद्याच्या अनुषंगाने गेल्या वर्षभरातील अनुभव, अडचणी विचारात घेऊन त्यांनी केलेल्या सूचनांवर विचारविनिमय करण्यात येईल. कायद्याच्या सर्वच घटकांचे पुनरावलोकन याअंतर्गत करावे लागणार आहे. त्या दृष्टीने या घटकांच्या लेखी सूचनांचा विचार करून त्यातील योग्य व चांगल्या सूचना विचारात घेऊन कायद्यात सुधारणा सुचविण्यात येतील''

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पुणे विभागाचे संचालक डॉ. धनराज माने, कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्यासह समितीचे सदस्य डॉ. विजय खोले, डॉ. राजन वेळूकर, डॉ. बी.पी. साबळे, मुंबई विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. नरेश चंद्रा, शीतल देवरुखकर-शेठ,डॉ. टी.ए. शिवारे हे सदस्य उपस्थित होते.